Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 22 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २२ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

भारत आणि कुवेत हे देश एकमेकांच्या पाठीशी नेहमीच उभे राहिले असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मोदी यांच्या दोन दिवसीय कुवेत दौऱ्यात, काल पहिल्या दिवशी कुवेत शहरातील शेख साद अल-अब्दुल्ला क्रीडा संकुलात आयोजित 'हाला मोदी' कार्यक्रमात भारतीय प्रवासी नागरिकांना संबोधित करतांना ते बोलत होते. 'नवीन कुवेत'साठी आवश्यक  कौशल्य, तंत्रज्ञान, नवकल्पना - मनुष्यबळ आपल्याकडे असून , भारताला विश्वबंधू म्हणून सादर करतांना आर्थिक समावेशन, महिलांच्या नेतृत्वाखालील विकास आणि डिजिटल संपर्क व्यवस्थेमधील देशाच्या प्रगतीवर मोदी यांनी यावेळी लक्ष वेधलं.

गेल्या ४३  वर्षात भारताच्या  पंतप्रधानांची कुवेतला झालेली ही पहिलीच भेट असून याद्वारे विविध क्षेत्रात उभय देशात मैत्री आणखी भक्कम होईल असंही मोदी यांनी या संदर्भातल्या आपल्या समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. त्यांच्या दौऱ्याच्या आजच्या दुस-या दिवशी, कुवेतचे अमीर आणि युवराज यांच्यासोबतच्या स्वतंत्र उच्चस्तरीय बैठकांपूर्वी पंतप्रधानांना बायन पॅलेस इथं औपचारिक मानवंदना देण्यात येईल. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये शिष्टमंडळ स्तरावर चर्चा होईल.

****

जणुकं उपचार- जीन थेरपीला जीएसटीतून  सूट देण्यासह  दंड आकारणी, बँका आणि गैर-बँकींग वित्त संस्थांच्या विलंबित भरणा शुल्कावर जीएसटी लावला जाणार नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्यांनी राजस्थानमधील जैसलमेर इथं वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली.

****

भारत पाच ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट साध्य करताना महाराष्ट्रही देशात अग्रेसर राहील, असं राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली काल जैसलमेर इथं केंद्रीय अर्थसंकल्पपूर्व बैठक झाली त्यावेळी तटकरे बोलत होत्या. यात २०२५-२६ च्या प्रस्तावित केंद्रीय अर्थसंकल्पातील निधी वाटप, दृष्टिक्षेपासह विविध मागण्यांवर राज्यांच्या अर्थमंत्र्यांमध्ये  चर्चा झाली. तटकरे यांनी महाराष्ट्रातील कृषी, आरोग्य, पायाभूत सुविधांससह विविध विकास धोरणांबाबत शासनाच्या प्रस्तावांची रूपरेषाही यावेळी सादर  केली.

****

द्राक्षापासून तयार होणाऱ्या मनुक्याला कृषी उत्पादनाचा दर्जा देत वस्तू आणि सेवा कर- जी.एस.टी.तून वगळण्याच्या महाराष्ट्राच्या मागणीला यश आलं आहे. राजस्थानातील जैसलमेर इथं काल झालेल्या जी.एस.टी. परिषदेच्या ५५व्या बैठकीत हळद-गूळासह मनुकाही करमुक्त करण्यास मान्यता देण्यात आली असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. जीएसटी परिषदेनं पोषणयुक्त तांदळावरील कर दरात कपात करून पाच टक्के करण्याचा निर्णय घेतला असून पाकिटबंद-उत्पादन माहिती दर्शवलेल्या  वस्तूंच्या व्याख्येत सुधारणा करण्याची शिफारसही केली आहे.

****

क्षयमुक्त भारत अभियान यशस्वी होण्यासाठी क्षयरोगींच्या समुपदेशनासह जनजागृतीही महत्वाची असल्याचं मत मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केलं. या अभियानाबाबत केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली काल दूरस्थ पद्धतीनं देशातील सर्व मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्र्यांची बैठक झाली. त्यावेळी महाजन बोलत होते.

****

भारतानं १९ वर्षांखालील मुलिंच्या आशिया चषक क्रिकेट टी-ट्वेंटी स्पर्धेच्या अंतिम लढतीत  बांग्लादेशला ४१ धावांनी पराभूत करत विजेतेपद पटकवलं आहे. मलेशियातल्या क्वालालंपूर इथं आज सकाळी झालेल्या या सामन्यात, बांग्लादेशनं

नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी केली.भारतानं  वीस षटकांत सात बाद ११७ धावा केल्या.प्रत्युत्तरात बांग्लादेशचा डाव एकोणीसाव्या षटकाचे तीन चेंडु शिल्लक असतांना सर्वबाद ७६ धावांवरच आटोपला.

****

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला इथं भारतीय कृषी अभियांत्रिकी संस्थेतर्फे कृषी अभियांत्रिकी विध्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. सरबजीत सिंग सूच यांनी यावेळी  `बायोगॅस तंत्रज्ञान: डिझाइन, विकास, अंमलबजावणी आणि स्थापनेसाठी सरकारी धोरणं` या विषयावर व्याख्यान दिलं. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुरेंद्र काळबांडे, अधिष्ठाता, कृषी अभियांत्रिकी विद्धयाशाखा हे होते. त्यांनी उपस्थित विध्यार्थ्यांना नवीकरणीय ऊर्जा अभियांत्रिकी या क्षेत्रामध्ये असणा-या संधी, नवीकरणीय ऊर्जेच्या वापराची गरज या संदर्भात मार्गदर्शन केलं.

****

नाशिक शहरातील थंडी कमी झाली असली तरी आज पहाटे सर्व शहरावर धुकं दाटलं होतं. धुक्यातलं नाशिक विशेषतः गोदाघाट पाहण्यासाठी  सकाळी नागरिकांनी रामकुंड परिसरात गर्दी केली होती. आज सकाळी १४ अंश सेल्सिअस अशी किमान तापमानाची नोंद झाली असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

थेट गावातील लोकांपर्यंत योजना पोहचाव्यात यासाठी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी अकोले तालुक्यातील मवेसी या आदिवासी गावात मुक्काम करून ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. सध्या प्रशासनातर्फे सुशासन सप्ताहांतर्गत `प्रशासन गांव की ओर` हे अभियान राबवलं जात आहे. कार्यक्रमस्थळी कृषी, पशुसंवर्धन, महसूल, आरोग्य, आदिवासी विकास, वन विभाग, पंचायत समिती, महिला व बालविकास, समाजकल्याण, दिव्यांग कल्याण, विशेष सहाय्य, संजय गांधी निराधार अनुदान योजना आदी विभागांच्या योजनांची दालनं लावण्यात आली होती.

****